

शिवाजी विद्यापीठात सरोजिनी बाबर : कार्य, संशोधन आणि लेखन या पुस्तकाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते गुरुवारी प्रकाशन झाले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. राजन गवस, डॉ. विलास नांदवडेकर उपस्थित होते.

# लोकसाहित्यासाठी बाबर यांनी आयुष्य वेचले : गवस

## सरोजिनी बाबर : कार्य, संशोधन पुस्तकाचे प्रकाशन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** लोकसाहित्य हे लोकज्ञान मानून या ज्ञानाचे संकलन करण्याकामी डॉ. सरोजिनी बाबर यांनी आपली हयात वेचली. त्या बहुजन समाजाच्या प्रतिनिधी होत्या. त्यांच्या कार्याविषयी शिवाजी विद्यापीठामार्फत पुस्तक प्रकाशित होणे ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस यांनी गुरुवारी केले.

डॉ. सरोजिनी बाबर यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त डॉ. वैशाली भोसले यांनी संपादित केलेल्या 'सरोजिनी बाबर : कार्य, संशोधन आणि लेखन' या पुस्तक प्रकाशनप्रसंगी शिवाजी विद्यापीठात झालेल्या कार्यक्रमात ते बोलत होते.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, गोरगरीब, शेतकऱ्यांविषयी प्रचंड कळकळ व आस्था बाळगून त्यांच्यासाठी, त्यांच्यामधीलच लोकसाहित्याचे कण वेचून सरोजिनी बाबर यांनी मराठी साहित्य समृद्ध केले. त्यांच्या योगदानाची अतिशय उत्तम दखल या पुस्तकात घेण्यात आली आहे.

प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील , कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर प्रमुख उपस्थित होते.

# ‘विद्यापीठ अध्यादेश तपासणी’चे पुनर्गठन

## व्ही. एन. शिंदे यांचा समावेश : ‘उच्च व तंत्रशिक्षण’चा आदेश

**लोकमत न्यूज नेटवर्क**

**कोल्हापूर :** विद्यापीठ अध्यादेश व परिनियमांची तपासणीसाठीच्या समितीचे राज्य शासनाने पुनर्गठन केले आहे. त्यामध्ये शिवाजी विद्यापीठाचे उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आणि औरंगाबाद येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे उपकुलसचिव दिलीप भारड यांचा सदस्यपदी समावेश करण्यात आला आहे. आदेश उच्च व तंत्रशिक्षण विभागाने काढला आहे.

अध्यादेश व परिनियमांची तपासणी करणाऱ्या समितीमध्ये आठ जणांचा समावेश आहे. पुनर्गठित समितीमध्ये उच्च शिक्षण संचालक (अध्यक्ष), नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलसचिव, मुंबईतील नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाचे कुलसचिव, शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलसचिव डॉ. राजेंद्र कांकारिया, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वरिष्ठ कायदा अधिकारी परवीन सय्यद (सदस्य), उच्च शिक्षण संचालनालयाचे प्रशासकीय अधिकारी (सदस्य सचिव) यांचा समावेश आहे. राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांबरोबरच यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ (नाशिक), कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय (रामटेक) यांच्याकडून प्राप्त होणाऱ्या परिनियम, अध्यादेशांना मान्यता देण्यापूर्वी तपासणी अथवा छाननी करून तसेच स्वयंअर्थसाहाय्यित विद्यापीठांचे पहिले परिनियम, आदेशांची तपासणी करून शासनास त्याबाबत शिफारस करण्याचे काम ही समिती करेल.

# पदोन्नतीच्या निकषांचे आकलनास कार्यशाळांमुळे मदत : कुलगुरू

कोल्हापूर : 'सुटा'ने प्राध्यापकांच्या हक्कांसाठी व प्रश्न सोडविण्यासाठी आवाज उठविला आहे. प्राध्यापकांना पदोन्नतीचे लाभ मिळवून देण्यात त्यांची महत्त्वाची भूमिका आहे. कार्यशाळेमुळे पदोन्नतीच्या निकषांचे नेमके आकलन प्राध्यापकांना होईल, असे मत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघाच्यावतीने (सुटा) मार्गदर्शन कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. प्र-कुलगुरू प्रा.डॉ पी. एस. पाटील यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावरील मान्यताप्राप्त संशोधन पत्रिकांमध्ये शोधनिबंधाचे प्रकाशन कसे करावे, याबाबत मार्गदर्शन केले. प्रा. डॉ. आर. जी. कोरबू यांनी मार्गदर्शन केले. 'सुटा 'चे अध्यक्ष प्रा आर. के. चव्हाण यांनी प्रास्ताविक केले. प्रा. एस. जी. पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. अरुण शिंदे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा सुधाकर मानकर, प्रा. डी.एन. पाटील, प्रा. ईला जोगी, प्रा. अरुण पाटील, प्रा. डी. आर. भोसले, आदी उपस्थित होते.

# पदवी प्रमाणपत्रासाठी १२ फेब्रुवारीपर्यंत अर्ज करा

**प्रतिनिधी**

कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या ५७ व्या दीक्षांत समारंभात पदवी प्रमाणपत्र घेण्यासाठी अर्ज भरण्याच्या तारखा विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात आल्या आहेत. ऑक्टोबर २०१९ व एप्रिल २०२० सत्रातील पदवी व पदव्युत्तरच्या अंतिम सत्राची परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी पदवी प्रमाणपत्रासाठी १३ जानेवारी ते १२ फेब्रुवारीपर्यंत अर्ज भरावयाचा आहे, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी केले आहे.

नियमित शुल्क २५० रुपये भरून १२ फेब्रुवारीपर्यंत, विलंब शुल्कासह १३ ते २० फेब्रुवारीपर्यंत ३५० रुपये शुल्क भरून अर्ज भरावयाचा आहे. अतिविलंब शुल्कासह २१ ते २८ फेब्रुवारीपर्यंत ८५० रूपये शुल्क भरून अर्ज भरावयाचा आहे. पीएच. डी. प्राप्त विद्यार्थ्यांनी ३१ मार्चपर्यंत ८५० रुपये शुल्क भरून अर्ज भरावयाचा आहे. ऑनलाईन अर्जाची प्रिंट पूरक कागदपत्रासह परीक्षा विभागात समक्ष किंवा पोस्टाने १० मार्चपर्यंत जमा करावयाची आहे. दीक्षांत समारंभासंदर्भातील सर्व माहिती www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.